दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ ▪ अंक २४९ ▪ गुरुवार २ जुलै २०२६ ▪ पाने ४ ▪ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## स्मार्ट मिटर बसविण्याची महावितरणची सक्ती नाही

### शिवसेनेच्या आंदोलकांसमोर महावितरणचे लेखी आश्वासन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महावितरणकडून ग्राहकांसाठी बसविण्यात येणारे स्मार्ट (प्रीपेड-पोस्टपेड) मिटर हे कोणत्याही सक्तीचे नसून मिटरच्या बिलांबाबत ग्राहकांची कुठलीही तक्रार असल्यास त्या तातडीने दुरुस्त करुन देणयात येईल अशी भुमिका महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांनी शिवसेनेने केलेल्या आंदोलनकर्त्यांनासमोर लेखीस्वरुपात स्पष्ट केली आहे.

ग्राहकांना स्मार्टमिटर हे महावितरणकडून सक्ती केली जात असल्याच्या निषेधार्थ शिवसेनेच्या वतीने महावितरण कांर्यालयात आंदोलन करण्यात आले. महाविरणकडून सध्या ग्राकांचे जुने मिटर काढून ते नवीन मिटर (स्मार्ट मिटर) बसविले जात आहे. तसेच त्याचे बिल सुध्दा जास्त येत आहे. सध्या पावसाळा सुरु असून पावसाची पुर्व तयारी दिसत नाही. लाईनवर आलेली झाडे काढणे, वायर तुटणे, लाईट पुर्ण दाबाने न येणे, लाईट गेली तर ती कधीर येईल हे सुध्दा जबाबदार अधिकारी उपस्थित नसतात. वाढीव आलेल्या बिलासाठी रोज महावितरणच्या खेटया घालतात कमी दाबाने व अचानक लाईट जाण्यामुळे लोकांच्या घरातील महागडया वस्तुंचे नुकसान होत असून याची भरपाई महावितरण देणार का ▪ पान ४ वर



नगरकरांनो हातगाडीवर वडे आणि भजी खाताय सावधान

## कढईतील काळ्या तेलात वडे, भजी तळणाऱ्यांवर होणार कारवाई

### अन्न व औषध प्रशासनाची आजपासून कारवाईची मोहीम





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील रस्त्यावर असणाऱ्या खाद्यपदार्थाच्या हातगाड्या तथा सर्वांना परिचित असलेली अनेक ठिकाणांची खाऊगल्ली, हॉटेल्स, उपहारगृहे, फास्ट फूड सेंटर, या सर्व ठिकाणी एकाच खाद्यतेलात वारंवार वडे, भजी, समोसे व इतर पदार्थ तळले जातात. एकच तेल अनेक दिवस वारंवार वापरल्याने ते काळे झालेले असते, नागरिकही फारशी चौकशी न करता असे पदार्थ आवडीने खातात मात्र, अशा सतत पुनर्वापर केलेल्या तेलामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत.

अशा काळ्या झालेल्या तेलाचा पुन्हा वापर करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.
अन्न व औषध प्रशासनाच्या सूचनेनुसार, वारंवार वापरले जाणारे खाद्यतेल हे घातक कचऱ्याच्या स्वरूपात मानले जाते. त्यामुळे त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.
मात्र, खर्च वाचवण्याच्या उद्देशाने अनेक व्यावसायिक त्याच तेलाचा पुन्हा-पुन्हा वापर करतात. असे प्रकार आढळून आल्यास संबंधित व्यावसायिकांवर आता कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. यासाठी आता विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे.

**खराब तेल ओळखणे..**
तेलाचा रंग काळा होणे
तीव्र उग्र वास येणे
जास्त प्रमाणात धूर येणे
तेल घट्ट किंवा चिकट होणे
तळलेले पदार्थ लवकर काळे पडणे
तेलाला फेस येणे, चव बदलणे

**खराब तेला मुळे होणारे आजार..**
तेल अनेक वेळा तापवल्यास त्यात अत्यंत घातक रासायनिक बदल होतात. हे तेल शरीरासाठी स्लो पॉइझनसारखे काम करते. यामुळे कर्करोग, पोटदुखी, यकृताचे आजार, हृदयविकार, रक्तवाहिन्यांचे आजार, अपचन असे आजार होऊ शकतात.

**कठोर कारवाई होऊ शकते...**
अन्न व औषध प्रशासनाकडून शहरातील हॉटेल्स, हातगाड्यांवरील खाद्यतेलाचे नमुने तपासले जाणार आहेत. नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार दंडात्मक कारवाई, परवाना निलंबन किंवा रद्द करणे, तसेच गंभीर प्रकरणात न्यायालयीन कारवाईचीही तरतूद आहे.

## थकित घरपट्टी वसुलीसाठी आता जप्तीची कारवाई - आयुक्त डांगे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अनेक वेळा सवलत देऊनही अहिल्या नगर शहरातील काही मालमत्ताधारकांनी आपल्या मालमत्तेचा कर तथा घरपट्टी अद्यापही भरलेली नाही, शहरातील सामान्य जनता मात्र दरवर्षी आठवणीने आपल्या घराची घरपट्टी न चुकता भरतात मात्र अनेक मोठ्या मालमत्ता धारकांनी अनेक वर्षापासून आणि यंदाही आपल्या मालमत्तेची घरपट्टी भरलेली नाही. त्यामुळे महापालिकेकडे यावर्षी मालमत्ता कर वसुली अवघी २३ कोटी जमा झालेली आहे. महापालिका प्रशासन कर तथा घरपट्टी वसुलीसाठी आता जप्तीची कारवाई करणार आहे.

मालमत्ताधारकांना आधी १०० टक्के शास्ती माफी, त्यानंतर सर्वसाधारण करात १० आणि ८ टक्के सवलत देऊनही धनदांडगे महापालिकेचा कर भरण्याकडे कानाडोळा करत आहेत. १ एप्रिल ते ३० जून या सवलतीच्या कालावधीत एकूण ३२ हजार ३७५ मालमत्ताधारकांनी कर भरला असून, त्यातून २३ कोटी १७ लाख ७४ हजार रुपये महापालिकेच्या तिजोरीत जमा झाले आहेत. अद्याप मालमत्ताधारकांकडे १५१.११ कोटी रुपये थकबाकी आहे.

आधीपासूनच आर्थिक अडचणीत असलेल्या महापालिकेच्या तिजोरीत विविध करांच्या माध्यमातून पैसे जमा व्हावेत, या उद्देशाने मार्च अखेरपर्यंत १०० टक्के शास्ती माफी (दंडात सूट) देण्यात आली होती. या काळात जवळपास १५ हजार ६२१ मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घेतला. त्यातून महापालिकेच्या तिजोरीत १७ कोटी १ लाख ६६ हजार रुपये जमा झाले. त्यानंतर एप्रिलमध्ये सर्वसाधारण करात १० टक्के आणि मे-जूनमध्ये ८ टक्के सवलत देण्यात आली. १ एप्रिल ते ३० जून दरम्यान सवलतीच्या काळात ३२ हजार करदात्यांनी कर भरला. उर्वरितांनी पुन्हा एकदा नियमित कर भरण्याकडे दुर्लक्ष केले आहे. थकबाकीदारांकडून कर वसुलीसाठी आता मालमत्ता जप्ती मोहीम राबविली जाणार असल्याचे महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

सवलत देऊनही अनेक मालमत्ताधारक दरवर्षी कर भरत नसल्याने महापालिका ▪ पान ४ वर

## दरोड्याची टोळी एलसीबीकडून उघड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** कर्जत तालुक्यातील वालवड येथील बंडू रामदास पांडुळे यांना १४ मार्च रोजी शस्त्राचा धाक दाखवून ६१ हजारांची लूट करणारी टोळी एलसीबीकडून उघड झाली आहे. याप्रकरणी प्रवीण उर्फ लाल भोसले (वय ३२, रा. बाभुळगाव, ता. कर्जत) याला पोलिसांनी अटक केली आहे. त्यांचे आणखी साथीदार निष्पण झाले असून ते फरार आहेत. या टोळीवर मिरजगाव पोलिस ठाण्यात तब्बल पाच गुन्हे दाखल आहेत.

आरोपीकडून ३० रु. किंमतीचा एक गावठी कट्टा, ८ लाखाची क्रेटा कार असा ८ लाख ३० हजार रुपये किंमतीचा माल जप्त केला आहे, सदरची कार्यवाई पोलिस निरीक्षक संतोष मुरकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी हरीष भुये, अंमलदार फुरकार शेख, किशोर क्षीरसाठ, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, बाळासाहेब खेडकर, रमिजराजा अतार यांनी केली आहे.

## नाथसागर धरणात पोहण्यासाठी गेलेले व्यापारी बेपत्ता; शोधमोहीम सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण येथील नाथसागर धरणात पोहण्यासाठी गेलेल्या शहरातील व्यापारी देवेंद्र कमलनारायण खंडेलवाल हे पाण्यात बुडाल्याची भीती व्यक्त करण्यात येत असून, त्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस, अग्निशमन दल आणि स्थानिक तरुणांकडून युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, देवेंद्र खंडेलवाल हे नाथसागर धरणात पोहत असताना अचानक पाण्यात तोल गेल्याने बुडू लागले. त्यांनी मदतीसाठी आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील काही तरुणांनी तत्काळ पैठण पोलीस ठाण्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक व नगरपरिषदेचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले.

▪ पान ४ वर



महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापतीपदी निवड झाल्याबद्दल श्री. सचिन अहिर यांचे अभिनंदन करत विधानपरिषद सभापती ना. प्रा राम शिंदे यांनी पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संसदीय कार्य मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटील, आमदार श्री. सतेज पाटील, आमदार श्री. अभिजित वंजारी, आमदार श्री. जयंत आसगावकर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना दर्जेदार गणवेश मिळाले पाहिजे : आ. दाते सर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना दर्जेदार शालेय गणवेश, बूट आणि पायमोजे उपलब्ध व्हावेत, तसेच वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर मोफत शालेय गणवेश योजनेतील आर्थिक तरतूद वाढविण्यात यावी, असी आग्रही मागणी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी प्रश्न उपस्थित करत आ. दाते यांनी शासनाचे लक्ष वेधले.

यावर बोलताना आमदार दाते यांनी केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या मोफत शालेय गणवेश योजनेत प्रति विद्यार्थी दोन गणवेश, बूट व पायमोजे देण्यासाठी करण्यात आलेली आर्थिक तरतूद वाढत्या महागाईच्या तुलनेत अपुरी पडत असल्याचा मुद्दा मांडला. कमी निधीमुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्य मिळण्यात अडचणी निर्माण होत असून, पालकांकडून निधी वाढविण्याची मागणी सातत्याने होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

यासोबतच, विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या दर्जाचे गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी प्रति विद्यार्थी आर्थिक तरतूद वाढविणे, निधी वितरण प्रक्रियेत सुधारणा करणे आणि शालेय गणवेश योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासन कोणती पावले उचलत आहे, अशी विचारणा त्यांनी केली.

यावर उत्तर देताना शालेय शिक्षण राज्यमंत्री दादाजी भुसे यांनी शासनाने ६ जुलै २०२३ च्या निर्णयानुसार प्रति विद्यार्थी दोन गणवेशांसाठी ६०० तसेच एक जोडी बूट व दोन जोड पायमोज्यांसाठी १७० इतकी आर्थिक तरतूद निश्चित केल्याची माहिती दिली. तसेच, २१ मे २०२६ च्या शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या अनुदानाव्यतिरिक्त शाळा व्यवस्थापन समित्यांनी लोकसहभाग अथवा निधी उपलब्ध करून ▪ पान ४ वर

## लेआउटमधील खुल्या जागा वाचवा; सुमारे १७० ते १८० प्रकरणांतील कथित १०० कोटींच्या गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करा- नगरसेवक योगिराज गाडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील मंजूर लेआउटमधील खुल्या जागा वाचविण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. महानगरपालिकेकडे अशा सुमारे १७० ते १८० प्रकरणांच्या फाईली प्रलंबित असून, या सर्व प्रकरणांमध्ये शासनाच्या नियमांना बगल देऊन निर्णय घेण्याचा प्रयत्न होत असल्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

नगररचना विभागाच्या नियमांनुसार तसेच शासनाच्या आदेशानुसार ३ डिसेंबर २०२० नंतर झालेल्या अनधिकृत तुकडेकरणाच्या प्रकरणांमध्ये लेआउटमधील खुल्या जागा राखून ठेवणे बंधनकारक आहे. सहसंचालक, नगररचना विभाग यांनीही अशा प्रकरणांमध्ये अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार त्यांच्या कार्यालयाकडे नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्य शासनाचे स्पष्ट मार्गदर्शन न घेता कोणतीही अंतिम मंजुरी देणे हे नियमबाह्य ठरू शकते.



उपलब्ध माहितीनुसार, या प्रकरणांमधील संभाव्य आर्थिक परिणाम सुमारे १०० कोटींच्या आसपास असू शकतात. त्यामुळे हा कथित गैरव्यवहार अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून, या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी. निर्णय प्रक्रियेत कोणतीही अनियमितता, अधिकारांचा गैरवापर किंवा आर्थिक हितसंबंध होते का, याचा सखोल तपास झाला पाहिजे.

लेआउटमधील खुल्या जागा या नागरिकांसाठी राखीव सार्वजनिक संपत्ती आहेत. या जागा मुलांच्या खेळासाठी, ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी, वृक्षारोपणासाठी, पर्यावरण संरक्षणासाठी आणि शहराच्या नियोजित विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत. अशा जागा कमी करणे म्हणजे अहिल्यानगरच्या भावी पिढ्यांच्या हक्कांवर गदा आणणे होय.

मी राज्य शासनाकडे मागणी करतो की, या सर्व १७० ते १८० प्रकरणांची सखोल चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे. चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणत्याही प्रकरणाला अंतिम मंजुरी देऊ नये. नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी किंवा इतर जबाबदार व्यक्तींवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

अहिल्यानगरच्या नागरिकांची सार्वजनिक संपत्ती कोणाच्याही फायद्यासाठी गमावू दिली जाणार नाही. शहराचे पर्यावरण, नागरिकांचे हक्क आणि महानगरपालिकेची मालमत्ता वाचविण्यासाठी आवश्यक असेल तर न्यायालयीन लढा तसेच व्यापक लोकआंदोलन उभारण्यात येईल.

## दै. आकर्षण निवडक

### डॉक्टर्स डे निमित्त डॉ. कैलास खडामकर व डॉ. आदित्य खडामकर यांचा अल्फा प्रतिष्ठानतर्फे गौरव



अहिल्यानगर - राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त बुधवार (दि. १ जुलै) रोजी गोरगरिबांना सवलतीच्या दरात दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणारे अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रसिद्ध त्वचारोग व गुप्तरोग तज्ज्ञ डॉ. कैलास खडामकर तसेच नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. आदित्य खडामकर यांचा अल्फा प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला. समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत सर्वसामान्य रुग्णांना परवडणाऱ्या दरात उपचार उपलब्ध करून देण्याचे उल्लेखनीय कार्य दोन्ही डॉक्टरांकडून सातत्याने केले जात आहे. त्यांच्या या सेवाभावी कार्याची दखल घेत अल्फा प्रतिष्ठानने त्यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. यावेळी व्यसनमुक्ती चळवळीतील कार्यकर्ते व पत्रकार निसार मास्टर, सामाजिक कार्यकर्ते तथा ज्येष्ठ कवी एम. पी. दिवाण आणि अन्सार भाई शेख यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी डॉक्टरांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत, वैद्यकीय सेवा ही केवळ व्यवसाय नसून सामाजिक उत्तरदायित्व आहे, असे मत व्यक्त केले. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी अशा सेवाभावी डॉक्टरांचे योगदान मोलाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. सत्काराबद्दल डॉ. कैलास खडामकर व डॉ. आदित्य खडामकर यांनी अल्फा प्रतिष्ठान तसेच उपस्थित मान्यवरांचे आभार मानले आणि भविष्यातही समाजहिताची वैद्यकीय सेवा अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

### शॉक लागून दोन दुभत्या म्हशींचा मृत्यू अनधिकृत वीजजोडणीचा घात

अहिल्यानगर- भिंगारजवळील बाराबाभळी शिवारात अनधिकृत वीजजोडणीमुळे विजेचा तीव्र शॉक बसून दोन दुभत्या म्हशींचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी (दि. २९) दुपारी चारच्या सुमारास घडली. या घटनेमुळे दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी नीलेश सतीश आहेरगवळी (वय ४०, रा. बाराबाभळी, ता. नगर) यांनी कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आहेरगवळी हे दूध व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सोमवारी दुपारी त्यांच्या दुभत्या म्हशी नेहमीप्रमाणे बाराबाभळी शिवारातील म्हशानखाणी परिसरात चरण्यासाठी सोडण्यात आल्या होत्या. याच ठिकाणी सार्वजनिक हायमॅक्स वीजखांब उभारलेला आहे. या घटनेमुळे दूध व्यवसायावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. ग्रामीण भागात अनधिकृत वीजजोडण्यांमुळे होणाऱ्या अपघातांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, अशा प्रकारांवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे. नीलेश आहेरगवळी यांच्या तक्रारीवरून कॅम्प पोलीस ठाण्यात अशोक कराळे आणि आबा कराळे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भिंगार येथील सामाजिक कार्यकर्ते दिपक बडदे यांचे निधन



अहिल्यानगर - भिंगार येथील सामाजिक कार्यकर्ते दिपक बडदे यांचे बुधवारी (दि.१ जुलै) मध्य रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. ते हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य होते. ग्रुपच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, पर्यावरण व आरोग्य चळवळीत भरीव योगदान दिले. हसतमुख आणि मनमिळावू स्वभावाने ते सर्वांना परिचित होते. त्यांच्या निधनाने कुटुंबीय व परिसरातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने सकाळी भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क येथे दिपक बडदे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ भाऊजाय, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी गुरुवारी भिंगार येथील अमरधाम येथे झाला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# मार्कंडेयच्या मुख्याध्यापिका विद्या दगडे यांचे शैक्षणिक कार्य आदर्शवत

## पद्मश्री पोपटराव पवार यांचे गौरवोद्गार । निवृत्तीनंतर अहिल्यानगर ग्रीन सिटी उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मार्कंडेय विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विद्या दगडे (वाघमारे) यांचे शैक्षणिक कार्य आदर्शवत आहे.आपल्या ३१ वर्षांच्या सेवेत त्यांनी शेकडो विद्यार्थी घडवले.असे गौरवोद्गार आदर्श गाव योजनेचे अध्यक्ष,पद्मश्री पोपटराव पवार यांनी काढले.निवृत्तीनंतर त्यांनी आता पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील अहिल्यानगर ग्रीन सिटी उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

मार्कंडेय विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विद्या दगडे ३१ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाल्या.सेवापूर्ती निमीत्त त्यांचा मंगळवारी (३० जून ) पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.अहिल्यनगर महानगर पालिकेचे उपमहापौर धनंजय जाधव, महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण,पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक,शिक्षक नेते रा.या.औटी,नगरसेवक निखिल वारे, बाबासाहेब वाकळे,अनिल बोरुडे, पुष्कर कुलकर्णी,रोहन सानप,मनोज दुल्लम, विनोद म्याना, मल्हार गंधे,संदीप कर्डीले.पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे,पद्मशाली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अशोक सब्बन,शंकर सामलेटरी,विनापक गुडेवार, बाळकृष्ण सिद्दम,भिमराज कोडम, शरद क्यादर,स्नेहीता संगम,डॉ. बब्लाळ,नूर मोहम्मद पठाण,मनपा शिक्षण



विभागाचे कुटे, सुर्यकांत दगडे,सुनील चौधरी,स्वप्नील दगडे,संकेत दगडे, निखिल दगडे यावेळी उपस्थित होते. पद्मश्री पवार म्हणाले की,सर्वच वक्त्यांनी मुख्याध्यापिका दगडे यांच्या कामाचा आढावा घेताना त्यांच्या विशिष्ट कार्यपद्धतीवर प्रकाश टाकला.त्यावरून त्यांच्या कामातील शिस्त, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी असणारी तळमळ, त्यासाठी त्यांनी राबवलेले कल्पक उपक्रम आणि मुख्याध्यापक म्हणून काम करताना त्यांच्यात असलेले नेतृत्वगुण याची ठळकपणे कल्पना येते.एकूणच त्यांचे शैक्षणिक काम आदर्शवत होते.असे पवार म्हणाले.

शिक्षणाधिकारी भास्कर पाटील म्हणाले की, मुख्याध्यापिका विद्या दगडे यांनी ३१ वर्षांच्या सेवेत २९ वर्षे मुख्याध्यापिका पदावर काम केले आहे.या काळात त्यांनी विशेषतः प्राथमिक वर्गातील विद्यार्थी घडवताना त्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्यावर उत्तम संस्कार व्हावेत यासाठी विविध उपक्रम राबवले. व्यक्तीमत्व विकासासाठी प्रयत्न केले.त्यातून सुसंस्कारित पिढी घडली.निवृत्तीनंतर त्यांनी आता बालसंस्कार वर्ग सुरू करावेत असे आवाहन शिक्षणाधिकारी पाटील यांनी केले.सध्याच्या काळात बालसंस्कार वर्गांची नितांत आवश्यकता असल्याचे ते म्हणाले.

माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक शशिकांत गोरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन गितांजली काकडे व सुचिता भावसार यांनी तर आभार मिनाक्षी बिंगेवार यांनी मानले.

उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून अहिल्यानगर ग्रीन सिटी उपक्रम राबवण्यात येत आहे. जागतिक तापमान वाढीच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम महत्वाचा आहे.हा उपक्रम केवळ उपमहापौर जाधव किंवा महानगरपालिकेचा तर शहरातील नागरिकांचा आहे. सर्वांचा उस्फुर्त सहभाग महत्त्वाचा आहे.मुख्याध्यापिका विद्या दगडे यांनी किमान १५१ झाडे लाऊन त्यांचे संवर्धन करावे.त्यासाठी त्यांना त्यांच्या सहकारी शिक्षकांनी सहकार्य करावे.या उपक्रमातील शिक्षकांचे सहकार्य हे त्यांच्यासाठी निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी शुभेच्छा ठरतील.

पद्मश्री पोपटराव पवार.

मुख्याध्यापिका विद्या दगडे यांनी विना अनुदानित,कोणत्याही भौतिक सुविधा नसलेल्या,श्रमीकनगर येथील मार्कंडेय प्राथमिक विद्यालयात आपल्या सेवेला सुरूवात केली. आपले अध्यापन कौशल्य, झोकून देऊन काम करण्याच्या वृत्तीमुळे तसेच उपजत असलेल्या नेतृत्व गुणांच्या जोरावर शाळा अल्पावधीतच नावारुपाला आणली. खासगी शाळांचे आवाहन परतवून लावले.त्यांचा आज आज पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते सन्मान होत आहे ही दगडे व वाघमारे परिवारासाठी गौरवास्पद बाब आहे.

संजय वाघमारे, संस्थापक अध्यक्ष पारनेर तालुका पत्रकार संघ.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काम करीत असताना मुख्याध्यापिका विद्या दगडे यांनी तत्वांशी कधीही तडजोड केली नाही.शाळेची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असणाऱ्या दगडे यांचे प्रशासकीय काम उत्तम होते.शिस्त आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर त्यांनी शाळा अल्पावधीतच नावारुपाला आणली.त्यांनी शिक्षण क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे.

बाळकृष्ण सिद्दम, निवृत्त मुख्याध्यापक, मार्कंडेय विद्यालय.

# डॉ. सलिम निसार शेख यांना इंग्रजी विषयात मानाची पीएच.डी.

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अकोले–** अकोले येथील अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. सलिम निसार शेख यांना कडून इंग्रजी विषयात पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.



भयपट साहित्य, चित्रपट, मालिका आणि लघुपट यांच्या आंतरमाध्यमीय रूपांतरांचा अभ्यास करणाऱ्याया संशोधन प्रबंधासाठी त्यांना ही मानाची पदवी देण्यात आली. या संशोधनात मुद्रित साहित्य आणि दृक–श्राव्य माध्यमांमध्ये भयाची अभिव्यक्ती कशी बदलते, याचा सखोल अभ्यास करण्यात आला असून ही नवीन सैद्धांतिक संकल्पनाही त्यांनी विकसित केली आहे.

हे संशोधन प्रो. डॉ. उमेश शिवराम जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. या उल्लेखनीय यशाबद्दल राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, आमदार सत्यजित तांबे तसेच विविध शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. शेख यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशामुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# पैठणात मुस्लिम समाजाचे निवेदन; नाझिया हसन खानवर कठोर कारवाईची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** प्रेषित पैगंबर मोहम्मद आणि मुस्लिम धर्माविषयी सातत्याने आक्षेपार्ह व द्वेषपूर्ण वक्तव्य करून धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करत नाझिया हसन खान यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पैठण शहरातील मुस्लिम समाजाच्या वतीने प्रशासनाकडे करण्यात आली.

यासंदर्भात तहसीलदार व पैठण पोलीस ठाण्याचे निरीक्षक यांना सोमवारी निवेदन देण्यात आले. निवेदनात नाझिया हसन खान यांनी केलेल्या कथित वक्तव्यांमुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचा उल्लेख करण्यात आला असून,



संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शहर–ए–काझी फजलुल्ला यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी शेख अखलाक हाफीज गाझी, अझ्जू कटयारे, मुस्ताक कुरेशी यांच्यासह मुस्लिम समाजातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, या प्रकरणी प्रशासनाने निवेदन स्वीकारले असून, पुढील कारवाई कायद्यानुसार केली जाईल, अशी अपेक्षा मुस्लिम समाजाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

# पर्यावरण संवर्धनासाठी समाजाने पुढे यावे - पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन

## स्नेहबंधतर्फे पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात वृक्षारोपण; पर्यावरण संरक्षणाचा दिला संदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय, परिसर (अहिल्यानगर) येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आले.

यावेळी स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, पोलीस उपअधीक्षक (शहर) डॉ. दिलीप टिपरसे, पोलीस उपअधीक्षक (ग्रामीण) शिरीष वमने, राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी पोलीस अधीक्षक मुम्मका



सुदर्शन म्हणाले, ‘‘वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून तो पर्यावरण संवर्धनाचा सातत्यपूर्ण संकल्प आहे. प्रत्येकाने एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन केल्यास हरित आणि प्रदूषणमुक्त समाज घडविण्यास मोठी मदत होईल. सामाजिक संस्थांनी अशा उपक्रमांतून जनजागृती करणे ही काळाची गरज आहे.‘‘

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, ‘‘पर्यावरणाचे रक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे. स्नेहबंध फौंडेशनच्या माध्यमातून वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृती व सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. भविष्यातही विविध शासकीय विभागांच्या सहकार्याने अधिकाधिक वृक्षारोपण करून हरित अहिल्यानगरच्या संकल्पनेला बळ देण्याचा आमचा प्रयत्न राहील.‘‘

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत करत अशा सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले.

# राधिका भरतनाट्यम अकॅडमी यांच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या नुकत्याच संपन्न झालेल्या एप्रिल २०२६ परीक्षा अंतर्गत भरत नाट्यम या विषयासाठी कल्याण रोड आदर्श नगर येथील कविता भांबरे - घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली नेहमीप्रमाणे १००% निकाल लागला.

पुढीलप्रमाणे प्रारंभिक– हत्वीका देवघडे, निधी नटाळे, काव्या झगडे, स्वरा खीलारी, कार्तिकी नजन, धनश्री गुंजाळ, तृप्ती गायकवाड, पूर्वी आढाव, श्रेया केंदळे, तेजश्री तरटे, तनिष्का दातरंगे. प्रवेशिका प्रथम –मनस्वी कावरे, वैदश्री कावरे, शर्वरी खताळ, विश्वा काकडे, अनुष्का सुंबे, पूर्वी नाटाळे,सान्वी तिवारी, मृणाल डोईफोडे, सान्वी तायडे, दूर्वा मवाळ, रुजवी सोनवणे, सबुरी लांडगे, सायली कांबळे, मेघना मंडलिक.

प्रवेशिका पूर्ण – रीवा राऊत, कीर्ती



अर्शनपैल्ली, रीतीशा कोरडे,आराध्या कवाष्ठे,हिमानी बोरुडे, ओवी गायकवाड, गार्गी अनभुले. मध्यमा प्रथम –रेवती बनबेरू, संतानिका लोडे , प्रगती अग्रवाल, इशिका भागवत, वेदांगी बोराडे. मध्यमा पूर्ण –तनिष्का बुरा, प्राणदा फुलारी, वेदिका गावडे, ईश्वरी कवाष्ठे, सिद्धी आडेप, प्रणाली रसाळ, रेणुका शिंदे,तनिष्का दळवी. विशारद प्रथम –शरन्या बकाल, मयुरी कर्णावट. याकरिता पालक आणि विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले जात असून भिंगार येथील ओमकार संगीत विद्यालय येथील अविनाश देऊळगावकर याच्या केंद्रातून परीक्षा संपन्न झाल्या तसेच गायनासाठी आदेश चव्हाण आणि मृदंग उत्कर्ष दळवी यांचे सहकार्य लाभले.

# फिरोदिया शिवाजियन्स पुन्हा ठरला एफसी युनिटी गोल्डन कपचा विजेता

## विजयाची केली हॅट्रिक; सडन डेथमधून सुमन एंटरप्रायझेस एफसीवर ४–३ अशी मात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भुईकोट किल्ला येथील मैदानावर युनिटी फुटबॉल क्लबच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आयोजित युनिटी गोल्डन कप फिरोदिया शिवाजियन्स संघाने पटकाविला. ७–अ–साईड फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब संघाने सुमन एंटरप्रायझेस फुटबॉल क्लब सडन डेथ पेनल्टी शूटआऊटमध्ये ४–३ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

अत्यंत अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात निर्धारित वेळेत दोन्ही संघांना गोल करण्यात अपयश आल्याने सामना ०–० असा बरोबरीत राहिला. त्यानंतर झालेल्या पेनल्टी शूटआऊटमध्येही दोन्ही संघांमध्ये चुरस कायम राहिल्याने निकाल सडन डेथमध्ये गेला. सडन डेथमध्ये फिरोदिया शिवाजियन्सच्या खेळाडूंनी अचूक फटके मारत ४–३ असा विजय मिळवून चषकावर आपले नाव कोरले. या विजेतेपदासह फिरोदिया शिवाजियन्सने सलग तिसऱ्या स्पर्धेचे विजेतेपद पटकावत आपली विजयी घोडदौड कायम राखली.



स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभास भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मयूर पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी किशन चौहान, राजेश चौहान, सुशील लोट तसेच युनिटी फुटबॉल क्लबचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

स्पर्धेतील वैयक्तिक बक्षीसांमध्ये फिरोदिया शिवाजियन्सचा सार्थक भोसले याला सर्वोत्कृष्ट स्ट्रायकर, सुमन एंटरप्रायझेसचा ओम डोंगरे याला सर्वोत्कृष्ट गोलरक्षक, तर फिरोदिया शिवाजियन्सच्या स्वराज आडेप याला सर्वोत्कृष्ट बचावपटू (बेस्ट डिफेंडर) या सन्मानासह गौरविण्यात आले. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते विजयी, उपविजयी व उत्कृष्ट खेळाडूंना बक्षिसे देण्यात आली.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी युनिटी फुटबॉल क्लबचे किशन चौहान, राजेश चौहान, सुशील लोट तसेच सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. युनिटी फुटबॉल क्लबच्या वतीने स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले होते.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### खेळाडूंसाठी मोफत दंत तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



अहिल्यानगर - श्री रामावतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मल्लखांब आणि योगा ट्रेनिंग सेंटर व साई डेंटल क्लिनिक, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी खेळाडूंसाठी मोफत दंत तपासणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये योगासन व मल्लखांब या क्रीडा प्रकारातील सुमारे १०० खेळाडूंची दंत तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ. गणेश नजन व डॉ. सौ. रत्ना नजन यांनी खेळाडूंना दातांची योग्य निगा कशी राखावी, तोंडाच्या स्वच्छतेचे महत्त्व, योग्य आहार तसेच नियमित दंत तपासणीची आवश्यकता याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.शिबिराच्या समारोपप्रसंगी सहभागी डॉक्टरांचा ट्रस्टचे ट्रस्टी श्री मोहन शेठ मानधना यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांनी अशा आरोग्यविषयक उपक्रमांमुळे खेळाडूंच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे सांगत या उपक्रमाचे कौतुक केले. या शिबिरामुळे खेळाडूंमध्ये दंत आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली असून, उपस्थित विद्यार्थी व पालकांनी या उपक्रमाचे स्वागत करून आयोजकांचे आभार मानले. याप्रसंगी सेंटरचे मुख्य प्रशिक्षण श्री उमेश झोटिंग, आप्पा लाढाणे, अक्षय पावडे, डॉ स्नेहा हराळ डॉ जोशना जगतकर डॉ नेहा पैठणकर त्यांच्यासमवेत सर्व पालक वर्ग उपस्थित होता.

### विधान परिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर; अहिल्यानगरमध्ये अखिल भारतीय सेनेकडून स्वागत



अहिल्यानगर- महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदी आमदार सचिन अहिर यांची एकमताने व बिनविरोध निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर शहरात अखिल भारतीय सेना च्या वतीने आनंद व्यक्त करुन या निवडीचे स्वागत करण्यातआले आहे. संघटनेच्या बैठकीत त्यांच्या अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला असून, ही निवड राज्याच्या संसदीय लोकशाहीसाठी तसेच सक्षम नेतृत्वाला मिळालेला योग्य सन्मान असल्याची भावना संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. आमदार सचिन अहिर यांची चळवळीतून घडलेला कार्यकर्ता ही त्यांची खरी ओळख आहे. मिल मजदूर संघाच्या माध्यमातून त्यांनी कामगारांच्या प्रश्नांसाठी संघर्ष केला. त्यानंतर १९९९ साली ते प्रथमच विधानसभेवर निवडून गेले. विविध मंत्रीपदे आणि संघटनात्मक जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळत त्यांनी राज्याच्या राजकारणात आपली स्वतंत्र छाप निर्माण केली आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ आता विधान परिषदेच्या कामकाजालाही होणार असल्याची भावना संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. अखिल भारतीय सेनेचे जिल्हाध्यक्ष आदिनाथ वनारसे यांनी सचिन अहिर यांचे अभिनंदन करताना सांगितले की, महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी योग्य, अभ्यासू, अनुभवी आणि निर्भीड नेतृत्वाची निवड झाली आहे. संसदीय कामकाजाचा अनुभव, सर्वपक्षीय समन्वयाची क्षमता आणि जनतेच्या प्रश्नांबाबतची संवेदनशीलता यामुळे सचिन अहिर हे या जबाबदारीसाठी सर्वार्थाने पात्र आहेत. त्यांच्या निवडीमुळे विधान परिषदेच्या कामकाजाला अधिक प्रभावी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.वनारसे म्हणाले की, एकेकाळी माजी आमदार अरुण गवळी यांना शिवसेनेची रक्तवाहिनी म्हणून ओळखले जात होते. आजही गवळी यांचे राजकारण आणि समाजकारण जनसामान्यांच्या प्रश्नांशी जोडलेले आहे. त्यांचे भाचे असलेले शिवसेना नेते सचिन अहिर यांनीही जनआंदोलनातून आणि कार्यकर्त्यांच्या बळावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्यशैलीमध्ये गवळी यांच्या निर्भीड, स्पष्टवक्तेपणा आणि जनहिताच्या भूमिकेची झलक पाहायला मिळते. त्यामुळे राज्याच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी ते उपसभापती म्हणून प्रभावी भूमिका बजावतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, शहरात आयोजित बैठकीत सचिन अहिर यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला. यावेळी ॲड. पवन कुमार, संतोष गुंदेचा, दीपक मेहेर, ॲड. किरण कुमार, भास्कर लवांडे, दीपक गाले, गणेश खोमणे, एकनाथ मीरपगार, नागेश खोमणे यांच्यासह अखिल भारतीय सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी सचिन अहिर यांच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत त्यांच्या पुढील संसदीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कल्याण अहिल्यानगर बीड परळी रेल्वेमार्गासाठी संघर्ष उभारणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर**–ऐतिहासिक वारसा लाभलेले विद्येचे माहेरघर पुणे व धार्मिक ऐतिहासिक परंपरांनी पावन क्षेत्र नाशिक या दोन्ही शहरांना जोडणारा पुणे-नाशिक रेल्वेमार्ग अर्थात पुणे-शिरूर-अहिल्यानगर-शिर्डी-सिन्नर-नाशिक रेल्वेमार्ग मंजूर केल्याबद्दल केंद्र सरकार,मा.रेल्वेमंत्री व मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे हार्दिक अभिनंदन.

आता प्रास्तावित मुंबई लातूर महामार्गाच्या समांतर कल्याण-मुरबाड-माळशेज(दाऱ्याघाट)शिवनेरी-वासुंदे मार्गे अहिल्यानगर रेल्वेमार्गाला मंजूरी देऊन ट्रँगल पूर्ण करावा.अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्ग गतीमान व्हावा.ज्यामुळे हा रेल्वेमार्ग बीड-परळीसह मराठवाड्याच्या विकासाचा राजमार्ग ठरेल.हा रेल्वेमार्ग झाला तर देशाची पश्चिम-पूर्व किणारपट्टी मुंबई-विशाखापट्टनम जोडणारा देशातला सर्वात मोठा रेल्वे प्रकल्प साकारला जाईल. तसेच कोंकण,प.महाराष्ट्र, मराठवाड्याला नजिकच्या मार्गाने मुंबईशी जोडणारा हा रेल्वेमार्ग साकारेल. या रेल्वेमार्गामुळे देशाच्या वैभवात भर पडेल. बीड,परळी,अहिल्यानगर,जुन्नर ,मुरबाडच्या शेतकऱ्याला उत्पन्नाचे जोडमार्ग प्राप्त होतील.अकोले- संगमनेरच्या दक्षिण डोंगराळ भागाचा कायापालट होईल. माळशेज-शिवनेरी-लेण्याद्री,भिमाशंकर या परिसरात पर्यटन उद्योग वाढेल व त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. शेतकऱ्याला जोडव्यावसायाच्या संधी प्राप्त होतील. पर्यटन उद्योगाला वाव मिळेल,साखर,भाजीपाला, फळे आदी कृषी उत्पादने मुंबई मार्गे देश विदेशात निर्यात करता येतील. त्यातून शेतकऱ्याच्या उत्पन्नात भर पडेल. विदेशी लक्ष्मी समृद्धीच्या मार्गांनी बळीराजाचे दार ठोठावेल. मुंबई-ठाणेची श्रीमंती, पुण्याची विद्वत्ता व अहिल्यानगरचा सहकार या त्रिवेणी संगमातून महाराष्ट्राचे भाग्य रेखाटले जाईल.

स्वातंत्रसेनानी स्व.गोविंदभाई श्रॉफ,स्व.खासदार केशरकाकू क्षीरसागर, स्व.आमदार श्रीकृष्णराव तांबे, स्व.निवृत्तीशेठ शेरकर,स्व.प्रकाश परांजपे,स्व. शांतारामबापू घोलप,स्व.गोपीनाथ मुंढे,स्व.बाळासाहेब विखेपाटील,स्व.दिलीप गांधी,स्व. स्वॉलि.गुलाबराव शेळके अशा अनेक दिग्गज नेत्यांनी मागणी केलेल्या या रेल्वेप्रकल्पाच्या मंजूरीसाठी सन १९९६ पासून माळशेज रेल्वे कृति समितीच्या माध्यमातून पाठपुरावा करित आहोत. हा रेल्वेमार्ग व्हावा म्हणून निर्धार मेळावे, रेल्वे परिषदा,जनजागरण यात्रा, रेल्वेरथयात्रा, ५ लाख सहयांची मोहिम,दिल्ली यात्रा असे सर्व सोपस्कार माळशेज रेल्वे कृति समितीने पार पाडले. त्यातून सन २००६ साली सर्वेक्षण झाले. तर सन २०१९ पासून मुरबाड पर्यंत पहिला टप्प्या मंजूर झाला. (हा पहिला टप्पा मढ-शिवनेरी पर्यत होणं हे व्यावहारिकदृष्ट्याही सोयीचे आहे.त्यातून मुरबाड, शिवनेरीपर्यंत ५ वी मुंबई विकसीत होईल.) या रेल्वेमार्गासाठी मा.शरद पवारसाहेब व मा.अण्णा हजारे यांचे आशिर्वाद लाभले.खा.सुप्रियाताई सुळे,शिवाजीराव आढळराव पाटील,खा.भाऊसाहेब वाकचौरे,बाळासाहेब थोरात,शिवाजीराव नलावडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी माळशेज रेल्वे कृति समितीला कायम सक्रिय साथ दिली.महाराष्ट्राच्या सर्वांगिन हितासाठी कल्याण-अहिल्यानगर अर्थात मंजूरीसाठी भविष्यात बीड,परळी पासून सर्वपक्षीय कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन तरुणांचे संघटीत करन संघर्ष उभारणार असा निर्धार माळशेज रेल्वे कृति समितीचे अध्यक्ष दिनेशचंद्र हुलवळे, उपाध्यक्ष मुरलीधर गुंजाळ,दादा भालेकर, मिलिंद गंधे यांनी व्यक्त केला आहे.या पत्रकार परिषदेला जि.प.सदस्या वैभव काळे आवर्जून उपस्थित होते.

## ईनाम जमिनीवर अतिक्रमणाचा डाव हाणून पाडला

**सतर्कतेमुळे भू-माफियांचा प्रयत्न फसला; पैठण पोलिसांत तक्रार दाखल**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठणपाचोड रस्त्यालगत असलेल्या मुकरी मशिदीच्या ईनाम जमिनीवर बेकायदेशीररीत्या ताबा मिळविण्याचा प्रयत्न सतर्कतेमुळे हाणून पाडण्यात आला. या प्रकरणी संबंधित ईनामदारांनी पैठण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पैठण शिवारातील गट क्रमांक २३ मधील सुमारे ७ एकर १६ गुंठे ईनाम जमिनीवर काही व्यक्तींनी जबरदस्तीने ताबा मिळविण्याचा प्रयत्न केल्याची माहिती रखवालदाराने ईनामदारांना दिली. त्यानंतर ईनामदारांनी घटनास्थळी धाव घेतली असता काही जण जमीन ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असल्याचे निदर्शनास आले.

याबाबत चौकशी केली असता संबंधितांकडे कोणतेही अधिकृत आदेश, कागदपत्र किंवा वक्फ मंडळाचा परवाना नसल्याचे समोर आले. त्यामुळे हा प्रयत्न तत्काळ रोखण्यात आला.

शहरात ईनाम जमिनींच्या बेकायदेशीर खरेदी-विक्री व प्लॉटिंगच्या हालचाली वाढत असल्याची चर्चा असून, अशा प्रकारांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. संबंधित यंत्रणांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन अशा प्रकारांना आळा घालण्याची मागणी होत आहे. दरम्यान, ईनामदारांनी मदतीसाठी पोलिस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधल्यानंतर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर संबंधितांनी तेथून काढता पाय घेतल्याचे सांगण्यात आले. या घटनेनंतर पैठण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील कारवाई सुरू आहे.

## दोन सख्खे भाऊ लेफ्टनंट पदावर हा दुर्मिळ योग- डॉ. भाऊसाहेब खिलारी

**आम्ही टाकळीकर व ढोकेश्वर विद्यालय यांच्या वतीने नागरी सत्कार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर–** पारनेर येथील ले. कर्नल प्रकाश गायकवाड व ले. कर्नल प्रसाद गायकवाड हे दोन सख्खे भाऊ आई, वडील, शिक्षक यांच्याकडून प्रेरणा घेऊन ध्येय ठरवून, मोठे स्वप्न पाहून सैन्यात लेफ्टनंट पदापर्यंत वयाच्या २३ व्या व २१वयातच पोहोचले हा दुर्मिळ योग असावा असे प्रतिपादन जिल्हा मराठा संस्थेचे गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी केले.

ढोकेश्वर विद्यालय व आम्ही टाकळीकर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या प्रसंगी डॉ. खिलारी बोलत होते.

यावेळी ले. क. प्रकाश व प्रसाद यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ते म्हणाले, ८वी, ९वी व १०वी हे जीवनाचे ध्येय ठराविण्याची वेळ आहे तर ११ वी, १२ वी ही गोल्डन वेळ आहे. यावेळी जीवनातील बेस्ट अभ्यास करण्याची गरज आहे. आई -वडिलांसाठी, विद्यालयासाठी, गावासाठी, देशासाठी काम करा. याप्रसंगी, सामाजिक कार्यकर्ते पंडीत नाना झावरे, प्राचार्य लक्ष्मणराव मतकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी नवोदय विद्यालयाचे विद्यार्थी, प्र.





ग. खिलारी पाटील या विद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब बाळासाहेब निवडुंगे, मेजर गणपत ठाणगे, आई मंदा गायकवाड, वडील भास्कर गायकवाड, नवोदय विद्यालयाचे खिलारे सर, बापूसाहेब रांधवण, गणेशजी गायकवाड, डॉ. नरेंद्र मुळे, प्रविण झावरे, अशोक गांगड, पत्रकार विनोदजी गायकवड, संतोषजी कोरडे, वसंतजी रांधवण, अतुल सैद, अविनाशजी भालके, निलम खिलारी, वैशाली गायखे, दादाभाऊ नवले, प्रताप खिलारी, संतोषजी सोनवळे, उपप्राचार्य विरेंद्र धनशेट्टी, प्रा. कोठावळे, प्रा. सुरोशी, प्रा. आल्हाट, प्रा. घुले, डॉ. वीर, चौरे सर, भालेकर सर, चव्हाण सर, रवी मते इत्यादी पालक आणि शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊसाहेब हिंगडे यांनी केले तर आभार बाबासाहेब जाधव यांनी मानले.

**विद्यालयास स्मार्ट बोर्ड देणार**

विद्यालयातील वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी इंटरअँक्टिव्ह स्मार्ट बोर्ड आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान लोकसहभाग व माजी विद्यार्थी यांच्या सहयोगातून लवकरच देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक, पत्रकार चाँद शेख यांनी प्रास्ताविकात दिली.

## शेतकरी व डॉक्टर हे समाजाचे खरे आधारस्तंभ; रोटरी क्लब पैठणतर्फे मान्यवरांचा गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** कृषी दिन आणि डॉक्टर्स डेचे औचित्य साधत रोटरी क्लब, पैठणच्या वतीने प्रगतिशील शेतकरी आणि वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉक्टरांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. पैठण औद्योगिक वसाहतीतील सेंट पॉल्स मिलन हॉल येथे आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

रोटरी क्लबचे ट्रेनर तथा सेंट पॉल्स इंग्लिश स्कूलचे संस्थापक रो. डॉ. व्हलेरियन फर्नांडिस यांच्या हस्ते नानेगाव येथील युवा शेतकरी बाळासाहेब माने, मुधलवाडी येथील प्रगतिशील शेतकरी विष्णू बोडखे, शेती क्षेत्रातील योगदानाबद्दल चंद्रशेखर पाटील तसेच पैठण येथील



अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. भारत झारगड आणि डॉ. सखुबाई झारगड यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना रो. डॉ. व्हलेरियन फर्नांडिस म्हणाले, ''शेतकरी हा देशाचा अन्नदाता असून डॉक्टर हे समाजाचे आरोग्यरक्षक आहेत. या दोन्ही घटकांच्या अथक परिश्रमामुळे समाज सक्षम आणि निरोगी राहतो. शेती आणि आरोग्य ही देशाच्या प्रगतीची दोन मजबूत चाके आहेत. समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणे ही रोटरी क्लबची सामाजिक बांधिलकी आहे.''

कार्यक्रमाला रोटरी क्लबचे अध्यक्ष गोपाळ जगताप, सचिव पवन लोहिया, उपाध्यक्ष बळराम लोळगे, रो. चंद्रशेखर पाटील, रो. बाळासाहेब माने, रो. डॉ. डॅनियल इंगळे, रो. रघुनाथ चन्ने, रो. गजानन आवारे, रो. जालिंदर फलके, रो. जयराज चव्हाण यांच्यासह रोटरी क्लबचे पदाधिकारी, सदस्य आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन रोटरी क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी केले.

## शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन आत्मनिर्भर व्हा – सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तृतीयपंथी व्यक्तींच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून, पात्र लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घेऊन आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे समाज कल्याण विभागामार्फत तृतीयपंथी व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित जिल्हास्तरीय विशेष कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त योगेश उगले, लैला गुरु नगरवाले, दिशा पिंकी शेख, किरण नेटके, चंद्रकांत काळोखे, ॲड. अनुराधा येवले, डॉ. विक्रम पानसंबळ, शिवाजी जाधव, दिलावर शेख तसेच मोठ्या संख्येने तृतीयपंथी व्यक्ती उपस्थित होत्या.

सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार म्हणाले की, तृतीयपंथी व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. समाज कल्याण विभागामार्फत आर्थिक, शैक्षणिक, स्वयंरोजगार आणि सामाजिक सुरक्षा योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांनी पुढाकार घेऊन बीज भांडवल योजनेसह शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. शासनाचे सर्व विभाग समन्वयाने कार्यरत असून, या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे.

कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त योगेश उगले यांनी रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती दिली. ॲड. अनुराधा येवले यांनी तृतीयपंथी व्यक्तींच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कांविषयी मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध मोफत कायदेशीर सहाय्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले. दिशा पिंकी शेख यांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र, तृतीयपंथी प्रमाणपत्र आणि ओळखपत्रश यांसारखी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असण्याचे महत्त्व स्पष्ट केले. वरिष्ठ वैद्यकीश अधिकारी डॉ. विक् पानसंबळ यांनी आरोग्य, मानसिक आरोग्य आणि व्यसनमुक्तीविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात व्यसनमुक्तीची शपथ घेऊन करण्यात आली. यावेळी दिवंगत काजल गुरु नगरवाले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यशाळेत तृतीयपंथी व्यक्तींसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. तसेच संजय गांधी निराधार अनुदान योजना, आयुष्मान भारत योजना आणि बीज भांडवल योजना यांसाठी अर्ज भरण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली.

## कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक सेवेमुळे देविदास मोरे यांना समाजाचा सन्मान

**सेवापूर्तीनिमित्त सत्कार सोहळ्यात मान्यवरांकडून गौरव**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ग्रामपंचायत अधिकारी म्हणून तब्बल २९ वर्षे प्रामाणिक, निस्वार्थी आणि कर्तव्यदक्ष सेवा बजावणारे श्री. देविदास यशवंत मोरे यांनी आपल्या कार्यकाळात जनतेचा विश्वास संपादन केला. त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त आयोजित सत्कार समारंभात ''निस्वार्थ आणि कर्तव्यनिष्ठ सेवेचीच खरी सेवापूर्ती असते,'' असे प्रतिपादन माजी जिल्हा सहकारी बँकेचे व्हाइस चेअरमन संपतराव म्हस्के यांनी केले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना म्हस्के यांनी मोरे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत त्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून ग्रामविकास अधिकाऱ्याचे शिक्षण पूर्ण केले. आल्हनवाडीसारख्या दुर्गम भागातून सेवेला सुरुवात करून नगर तालुक्यात २९ वर्षे त्यांनी निष्ठेने काम केले. संपूर्ण सेवाकाळात कोणत्याही प्रकारच्या बेकायदेशीर किंवा वादग्रस्त कामापासून दूर राहून त्यांनी स्वच्छ आणि पारदर्शक प्रशासनाची ओळख निर्माण केली. त्यांच्या याच प्रामाणिक कार्याची दखल घेत त्यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने गौरविण्यात आले, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी माजी सभापती बाबासाहेब गुंजाळ, पोपटराव निमसे, साहेबराव शेडाळे व मनोजभाऊ कोकाटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात पुरुषोत्तम मोरे यांनी देविदास मोरे यांच्या जीवनप्रवासाचा आढावा घेत त्यांच्या संघर्षमय वाटचालीचा आणि समाजाभिमुख कार्याचा परिचय करून दिला.

माजी सभापती बाबासाहेब गुंजाळ यांनी आपल्या मनोगतात मोरे कुटुंबाच्या एकोप्याचे विशेष कौतुक केले. आई-वडिलांचे छत्र हरपल्यानंतरही चारही भावांना एकत्र ठेवून संयुक्त कुटुंब पद्धतीचा आदर्श समाजासमोर निर्माण करण्याचे मोठे कार्य देविदास मोरे यांनी केले. आजच्या काळात समाजाने या कुटुंबाकडून बंधुप्रेम, ऐक्य आणि परस्पर सहकार्याचा आदर्श घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पोपटराव निमसे, मनोजभाऊ कोकाटे, सुधीर गुंड, दातीर साहेब, साहेबराव शेडाळे, राधाकिसन भुतकर, संजय निक्रड यांच्यासह अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून देविदास मोरे यांच्या प्रामाणिक कार्याचा आणि साधेपणाचा गौरव केला.




झोपडी कॅन्टीन ते टीव्ही सेंटर ते प्रोफेसर चौक ते सोना नगर चौक ते भिस्तबाग चौक लाईटच्या खांबावरील बोर्ड व रोडला असणारे अडथळे अतिक्रमणे स्टँडिंग बोर्ड झेंडे अतिक्रमण पथकाने कारवाई करण्यात आली सावेडी प्रभाग समिती १ माननीय आयुक्त यांच्या आदेशानुसार अतिक्रमण प्रमुख आदित्य बल्लाळ यांच्या उपस्थितीत क्षेत्रीय अधिकारी प्रभाग समिती एक व अतिक्रमण पथक कारवाई करण्यात आली. (छाया – राजू खरपुडे)



अतिक्रमण विभागाची कारवाईत आयुर्वेद कॉर्नर ते रिमांडोम परिसरातील रस्ता पूर्णपणे रिकामा करण्यात आला.

## डॉक्टरडे निमित्ताने गरुड कॅन्सर सेंटरचे प्रमुख डॉ.प्रकाश गरुड यांचा सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** डॉक्टरडे निमित्ताने गरुड कॅन्सर सेंटर चे प्रमुख डॉ.प्रकाश गरुड यांचा सत्कार करण्यात आला.वैद्यकीय सेवा म्हणजे ईश्वरसेवा अशी प्रचलित म्हण आहे.त्याचं म्हणीच्या अनुषंगाने रुग्णांना सेवा प्रदान करणारे प्रख्यात कॅन्सर तज्ञ डॉ. प्रकाश गरुड यांचा डॉ. डे निमिताने रोटरी क्लब चे माजी अध्यक्ष श्री रफिक मुन्शी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांनी सांगितले कि,डॉ.प्रकाश गरुड फक्त रुग्णांना शासकीय योजनाचा लाभ देऊन फक्त उपचार करित नाहीत,तर झोपडपट्टी, दुर्गम ग्रामीण भागात शिबीर घेऊन माहिती देत असतात.रुग्ण जर प्राथमिक स्टेज वर असला तर तात्काळ मोफत उपचार करतात, हे त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे. सावेडी येथील गरुड कॅन्सर हॉस्पीटलची रुग्ण सेवा वाखाणन्या सारखी आहे.त्यांना नुकताच परदेशातून वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण करून आलेले त्यांचे चिरंजीव डॉ.योगेश गरुड आणि त्यांच्या पत्नी डॉ. गरुड मॅडम त्यांच्या बरोबर रुग्णसेवा करीत आहेत. सत्कार कार्यक्रमास श्री मोहसीन शेख आणि जाकीर भाई उपस्थित होते.

## भाई सथ्था नाईट हायस्कूलमधील अकरावी–बारावीच्या विद्यार्थ्यांना पुस्तक संचांचे वाटप

### यशवंती मराठा महिला मंडळाने राबविलेला उपक्रम स्वर्गीय प्रा. शिरीष मोडक यांना खरी श्रध्दांजली – डॉ. पारस कोठारी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आर्थिक, सामाजिक तसेच कौटुंबिक अडचणींवर मात करत दिवसा काम करून उदरनिर्वाह आणि रात्री शिक्षण घेण्याचा संघर्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ देण्यासाठी यशवंती मराठा महिला मंडळाने पुढाकार घेतला. हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील अकरावी व बारावीच्या कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना पुस्तक संचांचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाला मदत करण्यात आली.

रात्रशाळेत आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे विद्यमान चेअरमन डॉ. पारस कोठारी होते. यावेळी नगरसेविका गीतांजली काळे, यशवंती मराठा महिला मंडळाच्या शहराध्यक्ष मीराताई बारस्कर, संस्थापक अध्यक्षा मायाताई कोल्हे, प्राचार्य सुनील सुसरे, माजी मुख्याध्यापिका निर्मला भंडारी तसेच महिला मंडळाच्या मीराताई बेरड, संगीताताई दरेकर, अपर्णा शेलार, कल्पनाताई भंडारी, वैष्णवीताई बारस्कर, वर्षा लगड, मंगलाताई देशमुख, अनिता मोरे, मंगलताई शिरसाठ, लताताई भापकर, वैशाली थोरात, राजश्री शेळके, आशाताई शिंदे, विद्याताई काळे, मेधाताई झावरे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष स्वर्गीय प्रा. शिरीष मोडक यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या समर्पित कार्याचा यावेळी उपस्थितांनी भावपूर्ण शब्दांत गौरव केला. प्रास्ताविकात प्राचार्य सुनील सुसरे यांनी रात्रशाळेतील विद्यार्थ्यांचा संघर्ष अधोरेखित करत सांगितले की, अनेक विद्यार्थी दिवसभर नोकरी, व्यवसाय अथवा मजुरी करून रात्री शिक्षणासाठी वर्गात येतात. प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षण पूर्ण करण्याची त्यांची जिद्द प्रेरणादायी आहे. अशा विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी यशवंती मराठा महिला मंडळाने पुढाकार घेतला असून, हा उपक्रम समाजासाठी आदर्शवत आहे. समाजातील विविध संस्था अशा विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या तर अनेकांचे भविष्य उज्वल होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

नगरसेविका गीतांजली काळे म्हणाल्या की, यशवंती मराठा महिला मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येते. यंदा रात्रशाळेतील विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन पुस्तक संच उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, हा मंडळाचा कायमचा प्रयत्न आहे. शिक्षण हीच खरी समाजपरिवर्तनाची गुरुकिल्ली असून, प्रत्येक सक्षम नागरिकाने आपल्या परीने शिक्षणासाठी योगदान दिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

यशवंती मराठा महिला मंडळाच्या शहराध्यक्ष मीराताई बारस्कर म्हणाल्या की, रात्रशाळेतील विद्यार्थ्यांचा संघर्ष पाहिल्यानंतर त्यांना मदत करण्याचा निर्णय महिला मंडळाने घेतला. दिवसा कष्ट आणि रात्री अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वप्न पूर्ण व्हावे, यासाठी हा छोटासा प्रयत्न आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा ओळखून अशाच प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविले जातील. समाजातील प्रत्येक घटकाने शिक्षणासाठी हातभार लावला तर अनेक कुटुंबांचे भविष्य बदलू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संस्थापक अध्यक्षा मायाताई कोल्हे म्हणाल्या की, शिक्षणामुळेच व्यक्तीचे जीवन बदलते आणि समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतो. आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागलेल्या विद्यार्थ्यांनी पुन्हा शिक्षणाची वाट धरली, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.

## रक्तदान शिबिराचा उपक्रम समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे उत्तम उदाहरण – पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन

### रोटरी क्लब मिडटाउन व नोबेल हॉस्पीटलच्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, ज्याला रक्ताची गरज भासते त्यालाच त्याचे खरे महत्त्व समजते. रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे यासाठी अशा सामाजिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन होणे आवश्यक आहे. अहमदनगर रोटरी क्लब मिडटाउन व नोबेल एशियन हॉस्पिटल यांनी आयोजित केलेले रक्तदान शिबिराचा उपक्रम समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे उत्तम उदाहरण असून, या उपक्रमासाठी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी काढले.

डॉक्टर्स डे निमित रोटरी क्लब अहमदनगर मिडटाऊन व एशियन नोबेल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरास सदिच्छा भेट देत पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी शुभेच्छा दिल्या. रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी नोबल हॉस्पिटलचे संचालक डॉ.बापूसाहेब कांडेकर, इंडियन मेडिकल असोसिएशनच्या नगर शाखेचे अध्यक्ष डॉ.धनंजय कुलकर्णी, रोटरी क्लब मिडटाऊनचे अध्यक्ष अँड हेमंत कराळे, सेक्रेटरी मधुर बागायत, डॉक्टर्स असोसिएशनचे सेक्रेटरी डॉ.अमित करडे, महिला विभागाच्या अध्यक्षा डॉ.ज्योत्सना डौले, सेक्रेटरी डॉ.सोनल बोरुडे, डॉ. संगीता कांडेकर, प्रोजेक्ट चेअरमन विजय निकम आदींसह क्लबचे सदस्य, हॉस्पिटल मधील डॉक्टर, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.



डॉ.बापूसाहेब कांडेकर म्हणाले, नोबेल हॉस्पिटल व रोटरी क्लब मिडटाउन गेल्या १९ वर्षांपासून अविरतपणे डॉक्टर डे निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करत आहोत. रोटरी क्लबच्या नव्या अध्यक्षांचा सामाजिक कार्यकाळासही याच उपक्रमाने सुरुवात होत असते. डॉक्टर, सीए व शेतकरी यांचे समाजासाठी मोठे योगदान आहे. म्हणून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रक्तदान हा स्तुत्य उपक्रम आहे.

रोटरी क्लबचे अध्यक्ष अॅड.हेमंत कराळे म्हणाले, जगातील दोनशे देशांमध्ये गेल्या १२० वर्षांपासून रोटरी क्लब सामाजिक दायित्व्याने योगदान देत आहे. आज पूर्ण जगात रोटरी क्लबच्या नवीन वर्षास सुरुवात होत आहे. रोटरी क्लब मिडटाउन व नोबेल हॉस्पिटलच्या या सामाजिक उपक्रमाला दरवर्षी उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

यावेळी डॉ.धनंजय कुलकर्णी यांनी उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. रक्तदान शिबिरात रोटरी मिडटाऊन क्लबचे सदस्य, हॉस्पिटलचे डॉक्टर, कर्मचारी व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत प्रतिसाद दिला. डॉक्टर डे निमित्त रोटरी मिडटाऊन क्लबच्या वतीने सर्व डॉक्टरांचा गुलाबपुष्प व तुळशीचे रोप देवून सन्मान करण्यात आला.

नोबेलचे मुख्याधिकारी विजय निकम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. रोटरी क्लबचे सेक्रेटरी मधुर बागायत यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला रोटरी क्लबचे भावी प्रांतपाल क्षितिज झावरे, माजी पंतपाल प्रमोद पारिख, माजी अध्यक्ष डॉ. विनोद मोरे, माजी सेक्रेटरी मनीष गोपालकृष्णन, नोबल हॉस्पिटलचे डॉ.राहुल हिरे, डॉ.विश्वजित मोरे, मार्लिन एलिषा, विजय इंगळे, प्रतापसिंग पांडे, रमेश उबाळे, वैशाली कराळे, अभिजीत जाधव, ओमकार कुलकर्णी, वर्षा पांडे, रमेश वाबळे, सुजाता वाबळे, मधुरा झावरे, टीना इंगळे, अभिजीत जाधव, अनुजा जाधव, डॉ.आदिती पानसंबळ, डॉ.सोनल बोरुडे, रोहन खिलारी, तुषार देशमुख, रोहित साळुंके, डॉ. सारिका मोरे, डॉ.कृष्णा बलदवा, अक्षय राऊत, अश्विनी दगडे, अनुराधा आरसुळे, डॉ.नितीश इंगळे, डॉ. प्रकाश गरुड व डॉ. योगेश गरुड आदी उपस्थित होते.

## ग्राहक पंचायतीचे कार्य दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे यासाठी – क्षीरसागर

### सजग विद्यार्थी ग्राहक प्रबोधन अभियान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ग्राहक पंचायत महाराष्ट्र ही संघटना तंत्रज्ञानाचा, सेवांचा व सुविधांचा वापर योग्य रीतीने व्हावा यासाठी प्रयत्न करते. एका अर्थाने दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे यासाठी ग्राहकांना जागृत करणे, त्यांना त्यांच्या न्याय हक्काची जाणीव करून देणे व तरीही समस्या उद्भवलीच तर त्यातून सुटकेचा मार्गही सुचवते असे प्रतिपादन ग्राहक पंचायत महाराष्ट्रच्या अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर यांनी केले.

प्रथम एज्युकेशन फाउंडेशन संचालित प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्र, कामरगाव व ग्राहक पंचायत महाराष्ट्रची अहिल्यानगर जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ' सजग विद्यार्थी ग्राहक प्रबोधन ' या अंतर्गत आयोजित कार्यक्रमात क्षीरसागर बोलत होते. याप्रसंगी प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे विभाग प्रमुख दिवाकर भोयर, ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय सोनार, जिल्हा सचिव अॅड. सिद्धार्थ वाघमारे,, सहसचिव संजय जोशी, अजित कटारिया व डॉ.कविता शिंदे तसेच प्रथम एज्युकेशन फाउंडेशनचा सर्व शिक्षक व सेवक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

क्षीरसागर पुढे म्हणाले, डिजिटल युगात दैनंदिन जीवन गतिमान झाले आहे. तंत्रज्ञानाचा वापर योग्य रीतीने केल्यास ते जीवन सुसह्य करते मात्र गैरवापर केल्यास त्याच तंत्रज्ञानामुळे



मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. अशावेळी ग्राहकांच्या न्याय हक्कासाठी ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी यांनी स्थापन केलेली ग्राहक पंचायत ही ग्राहकांसाठी ग्राहकांनीच उभी केलेली चळवळ धावून येते.

विद्यार्थीदशेपासूनच ग्राहक म्हणजे काय ? ग्राहकांचे हक्क काय? कर्तव्य काय? याची माहिती व्हावी यासाठी राज्यभर ' सजग ग्राहक विद्यार्थी प्रबोधन ' हे अभियान राबवले जाते. ग्राहकाला त्याच्या हक्काची जाणीव असेल व कर्तव्याची त्याला जोड असेल तर फसवणुकीचे व लुबाडणूकीचे प्रसंग येणारच नाही. कोणतीही कृती प्रामाणिकपणे आणि नियमांचे अनुकरण करून करणे हा कर्म सिद्धांत सोप्या भाषेत क्षीरसागर यांनी समजून सांगितला.

याप्रसंगी बोलताना ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय सोनार म्हणाले, उपलब्ध साधन सामग्रीचा संयमाने वापर केल्यास असे प्रश्न आपोआप सुटू शकतात. विद्यार्थ्यांच्या जीवनात उपलब्ध नैसर्गिक संपदा अर्थात पाणी, वीज, इंधन, अन्न, शालेय साहित्य याचा वापर संयमाने केल्यास स्वतःच्या कुटुंबासह राष्ट्राचे कुटुंबाचे हीत आपोआप साधले जाईल.

याप्रसंगी ग्राहक पंचायतीचे जिल्हा सचिव व योग शिक्षक सिद्धार्थ वाघमारे यांनी जागतिक योग दिनानिमित्त निवडक आसने फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांना शिकवली व करून घेतली. त्यांनी जागतिक योग दिनाचे महत्त्व व त्याचा भावी जीवनासाठी होणारा लाभ याबाबत माहिती दिली.

दिवाकर भोयर यांनी संस्थेविषयी व संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीबाबत सविस्तर माहिती दिली.याप्रसंगी संजय जोशी व अजित कटारिया यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर वायबासे यांनी केले.

प्रथम एज्युकेशन फाउंडेशनचे केंद्रप्रमुख औदुंबर मांगले, प्रदीप बांगर, प्रथम फाउंडेशनचे प्रशिक्षक रवी फसले, अमर गरड, ओंकार वाडकर, सुरज मोरे, माया ओहोळ, विनोद शिंगाडे, संतोष शिरोळे उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थी व मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून झाली.

## दिव्यांगांप्रती संवेदनशीलता हीच खरी समाजसेवा- सक्षमच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी- डॉ. महेश वीर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सक्षम संस्थेच्या स्थापना दिनानिमित्त नवीन टिळक रोड येथील विघ्नहर्ता हॉस्पिटलमध्ये दिव्यांग बांधवांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिरास जिल्हाभरातून दिव्यांग व्यक्तींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध तज्ज्ञ डॉक्टरांनी आरोग्य तपासणी करून मोफत औषधोपचार करून,दिव्यांगांनी आरोग्याची घ्यावयाची काळजी यावर मार्गदर्श केले.

यावेळी बोलताना विघ्नहर्ता हॉस्पिटलचे अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. महेश वीर म्हणाले समाजाप्रती असलेल्या कर्तव्यभावनेतून सेवा केली तर खरे समाधान मिळते. दिव्यांगांना सहानुभूतीची नव्हे, तर संधी आणि पाठबळाची गरज आहे. त्यांनी तयार केलेल्या वस्तूं आपण खरेदी करून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी समाजाने पुढे यावे. सक्षम संस्था दिव्यांगांना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनविण्याचे मोलाचे कार्य करत असून अशा संस्थांच्या पाठीशी समाजाने खंबीरपणे उभे राहिले पाहिजे.

शिबिरामध्ये मेडिसिन तज्ज्ञ डॉ. पीयूष मराठे, अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. महेश वीर, डॉ. अखिल धानोरकर व डॉ. अमित कुलंगे, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुप्रिया वीर व डॉ. निलोफर धानोरकर, नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. राजीव चिटगोपेकर, कान–नाक–घसा तज्ज्ञ डॉ. आनंद तुळजापुरे तसेच दंतचिकित्सक डॉ. .कुलकर्णी व डॉ. कीर्ती कोल्हे यांनी तपासणी केली. स्त्रीरोग, दंतचिकित्सा, सर्वसाधारण वैद्यकीय तपासणी, अस्थिरोग, कान–नाक–घसा, नेत्र तपासणी, नेत्रदान नोंदणी करण्यात आली. जनकल्याण रक्तपेढीच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .

सक्षमचे पश्चिम प्रांत उपाध्यक्ष श्रीधर बापट म्हणाले की सक्षम संस्था राज्यासह देशभर दिव्यांगांच्या हक्कांसाठी कार्यरत असून त्यांना शिक्षण, स्वयंरोजगार, कौशल्य प्रशिक्षण आणि स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देत आहे. अनेक दिव्यांग युवकांना शासकीय सेवेत नोकरी मिळवून देण्यात संस्थेचे मोठे योगदान आहे. समाजाने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दिव्यांगांच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

(पान १ वरून)

### स्मार्ट मिटर बसविण्याची महावितरणची सक्ती नाही

असा सवाल उपस्थित होत आहे. अशा विविध मागण्यांसाठी शिवसेनेच्या वतीने महावितरण कार्यालयात आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनात संभाजी कदम, दत्तात्रय कावरे, सुरेश तिवारी, आबा गुंड, घनश्याम घोलप, सागर थोरात, सुशांत कोकाटे, प्रताप गडाख, अक्षय भिंगारे, प्रशांत गायकवाड, .शेख अश्पाक, विनय वाखुरे, अरुण झेंडे, बाळासाहेब बोराटे, रवी लालबोंद्रे, संजय छजलाणी, सुनिल भिंगारदिवे यांच्यासह आदी सहभागी झाले होते. यावेळी अधिक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांनी सदरचे स्मार्ट मिटर बसविणे हे कुठलेही स्क्तीचे नसल्याचे लेखी आश्वासन यावेळी आंदोलनकर्त्यांना देण्यात आले.

### थकित घरपट्टी वसुलीसाठी आता जप्तीची कारवाई - आयुक्त डांगे

आर्थिक अडचणीत आहे. त्यामुळे विकासकामांसाठी वेळेत निधी उपलब्ध होत नाही. जप्तीपूर्वी कर भरावा...

मालमत्ताधारकांनी नियमित कर भरावा. ज्यांच्याकडे थकबाकी आहे, त्यांनी आता मालमत्ता जप्त करणे, नळ कनेक्शन बंद करणे आदी कारवाई करण्यापूर्वी कर भरावा.

### नाथसागर धरणात पोहण्यासाठी गेलेले व्यापारी बेपत्ता; शोधमोहीम सुरू

बचाव पथकाकडून धरण परिसरात कसून शोधमोहीम सुरू करण्यात आली असून, वृत्त लिहिपर्यंत देवेंद्र खंडेलवाल यांचा शोध लागला नव्हता.
या घटनेमुळे पैठण शहरातील व्यापारी वर्गात हळहळ व्यक्त होत असून, नाथसागर धरण परिसरात नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे. दरम्यान, देवेंद्र खंडेलवाल हे नाथसागर धरणाकडे पोहण्यासाठी जात असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

### विद्यार्थ्यांना दर्जेदार गणवेश मिळाले पाहिजे : आ. दाते सर

देण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, आर्थिक दुर्बल कुटुंबांवरील भार कमी व्हावा आणि प्रत्येक विद्यार्थ्याला सन्मानाने शिक्षण घेता यावे, या उद्देशाने आमदार काशिनाथ दाते यांनी उपस्थित केलेल्या या लक्षवेधीची सभागृहात दखल घेण्यात आली. शिक्षणाशी निगडित प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करणारे लोकप्रतिनिधी म्हणून त्यांच्या भूमिकेचे यानिमित्ताने पुन्हा एकदा दर्शन घडले.